MGC/F/3261

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**परिपत्रक**

**२०२०-२१**

क्र. प्र.ले.(वित्त)/प्रकल्प/३७ दि.२५/१२/२०२०

**विषय:-** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमधील म्हाडा लेआऊट तसेच मुंबई पोर्ट ट्रस्ट (एमबीपीटी), पी.डब्ल्यू.डी. आणि बी.ई.एस.टी च्या हद्दीमधील चाळी आणि वस्त्यांच्या परिसरातील तसेच पोलिस वसाहती ह्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या गृहनिर्माण संस्थांच्या आवारातील अंतर्गत व बाह्य भागात असलेल्या सामाईक मोकळ्या जागेत जुन्या जीर्ण जलवाहिन्या व मल:निसारण वाहिन्या ह्यांची दुरुस्ती किंवा त्या बदलणे, किंवा नव्याने जलवाहिन्या व मल:निसारण वाहिन्या बसविण्याकरिता, लादीकरण करणे यासारखी मूलभूत नागरी सुविधा पुरविणे .

**संदर्भ:-** १. परिपत्रक क्र. सीए/एफएसडब्ल्यू/४३ दिनांक ०९.०३.२०१५.

२. परिपत्रक क्र. प्रले/वित्त/व्यय/११ दिनांक २०.०८.२०१९.

"लेखा संकेतांक ५०१२००००५ – प्रभाग समितीने सुचविलेल्या भांडवली स्वरुपाच्या रस्ते, पदपथ, रस्त्याच्या बाजूच्या पर्जन्य जलवाहिन्या व सुशोभिकरण आणि इत्यादी विकासकामे यांच्याशी संबंधित प्राधान्याने हाती घ्यावयाच्या कामांसाठी तरतूद व म्हाडा लेआऊट, बीपीटी इत्यादी वसाहतीमध्ये कामे करण्याकरिता अर्थसंकल्पात विशिष्टपणे केलेल्या तरतुदीमधून बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ६३ (के) अंतर्गत महानगर पालिकेच्या पूर्व मान्यतेने कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमधील म्हाडा लेआऊट तसेच मुंबई पोर्ट ट्रस्ट (एमबीपीटी), पी.डब्ल्यू.डी. आणि बी.ई.एस.टी च्या हद्दीमधील चाळी आणि वस्त्यांच्या परिसरातील तसेच पोलिस वसाहती ह्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या गृहनिर्माण संस्थांच्या आवारातील अंतर्गत व बाह्य भागात असलेल्या सामाईक मोकळ्या जागेत जुन्या जीर्ण जलवाहिन्या व मल:निसारण वाहिन्या ह्यांची दुरुस्ती किंवा त्या बदलणे, लादीकरण करणे यासारखी मूलभूत नागरी सुविधा पुरविणे या कामाचा समावेश केला आहे. मात्र, नवीन इमारतीचे बांधकाम करण्यात येऊ नये. या बाबतचे सुधारित निदेश महापालिका आयुक्त यांच्या मंजूरीने परिपत्रक क्र.प्रले/वित्त/व्यय/११ दिनांक २०.०८.२०१९ परित करण्यात आलेले आहे. सदर परिपत्रकान्वये प्रभाग समिती निधी तसेच उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने केलेल्या विशिष्टपणे अर्थसंकल्पिय तरतुदीमधून खर्च करण्यास परवानगी दिलेली आहे.

Scanned with CamScanner

संदर्भाधिन परिपत्रक क्र. प्रले/वित्त/व्यय/११ दिनांक २०.०८.२०१९ यामध्ये सुधारणा करून त्यानुसार वरील संदर्भाधिन परिपत्रक खालील सुधारित निदेशानुसार वाचण्यात यावे.:-

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमधील म्हाडा लेआऊट तसेच मुंबई पोर्ट ट्रस्ट (एमबीपीटी), पी.डब्ल्यू.डी. आणि बी.ई.एस.टी च्या हद्दीमधील चाळी आणि वस्त्यांच्या परिसरातील तसेच पोलिस वसाहती ह्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या गृहनिर्माण संस्थांच्या आवारातील अंतर्गत व बाह्य भागात असलेल्या सामाईक मोकळ्या जागेत जुन्या जीर्ण जलवाहिन्या व मल:निसारण वाहिन्या ह्यांची दुरुस्ती किंवा त्या बदलणे किंवा नव्याने जलवाहिन्या व मल:निसारण वाहिन्या बसविण्याकरिता, लादीकरण करणे यासारखी मूलभूत नागरी सुविधा पुरविणे या कामाचा समावेश केला आहे. उपरोक्त विषयांकित कामे "लेखा संकेतांक ५०१२००००५ – प्रभाग समितीने सुचविलेल्या भांडवली स्वरुपाच्या रस्ते, पदपथ, रस्त्याच्या बाजूच्या पर्जन्य जलवाहिन्या व सुशोभिकरण आणि इत्यादी विकासकामे यांच्याशी संबंधित प्राधान्याने हाती घ्यावयाच्या कामांसाठी तरतूद व म्हाडा लेआऊट, बीपीटी इत्यादी वसाहतीमध्ये कामे करण्याकरिता अर्थसंकल्पात विशिष्टपणे केलेल्या तरतुदीमधून बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ६३ (के) अंतर्गत महानगर पालिकेच्या पूर्व मान्यतेने कामे करण्याकरिता तत्वता मान्यता देण्यात येत आहे. मात्र, नवीन इमारतीचे बांधकाम करण्यात येऊ नये.

तसेच, महानगरपालिका नगरसेवक स्वेच्छा निधीमधून घ्यावयाच्या कामांसंबंधी मार्गदर्शक तत्त्वे महाराष्ट्र शासनाचे क्रमांक एएमसी/१४२००/२२६४/प्र.क्र. १४४/नवि. दिनांक २६.०२.२००१ चे परिपत्रक व विविध पुरक परिपत्रके निर्गमित केली आहेत. या परिपत्रकांनुसार करावयाच्या अनुज्ञेय कामांच्या यादीनुसार "बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमधील म्हाडा लेआऊट तसेच मुंबई पोर्ट ट्रस्ट (एमबीपीटी), पी.डब्ल्यू.डी. आणि बी.ई.एस.टी च्या हद्दीमधील चाळी आणि वस्त्यांच्या परिसरातील तसेच पोलिस वसाहती ह्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या गृहनिर्माण संस्थांच्या आवारातील अंतर्गत व बाह्य भागात असलेल्या सामाईक मोकळ्या जागेत महानगरपालिका नगरसेवक स्वेच्छा निधीतून बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ६३ (के) अंतर्गत महानगर पालिकेच्या पूर्व मान्यतेने कामे करण्यास तत्वता मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्त सुधारित निदेशांचे सर्व सहाय्यक आयुक्त/ उपायुक्त तसेच संबंधित विभागीय लेखा अधिकारी यांनी कृपया नोंद घ्यावी.

०६/११/२०२०

(रामदास आव्हाड)
प्रमुख लेखापाल (पा.पू.म.नि.)

०६/११/२०२०

(प्रदिप भ. पडवळ)
प्रमुख लेखापाल (वित्त)प्र.

(श्री. पी. वेलरासू)
अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)

(श्री. आय. एस. चहल)
मा. महापालिका आयुक्त

५/११/२०२०